# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे१८
## जाहिर सूचना
## जुन्या इमारतींचे संरक्षणात्मक परिनिरीक्षण करण्यासाठी बांधकाम अभियंते नोंदणीकृत करण्याबाबत

महाराष्ट्र शासन राजपत्र अधिसुचना १४ जानेवारी २००९ आणि महाराष्ट्र शासन राजपत्र अधिसुचना दि.८/०७/२०११ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २६५ मध्ये सुधारणा करणेबाबत अध्यादेश पारित केले आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे २६५ (अ) च्या कलमानुसार जुन्या इमारती अथवा मिळकती राहण्यासाठी योग्य आहेत किंवा नाहीत याबाबत बांधकाम अभियंत्याकडून तपासणी करून बांधकाम मजबूतीचा दाखला म्हणजेच स्ट्रक्टरल स्टॅबिलीटी रिपोर्ट (संरक्षणात्मक परिनिरीक्षण) दाखल करण्याच्या कार्यवाहीबाबत तरतूद करण्यात आलेली आहे.

उपरोक्त अधिसुचनेनुसार पिंपरी चिंचवड मनपा च्या हद्दीतील ज्या इमारतींचे बांधकामे ३० वर्षापूर्वीची आहेत अशा सर्व इमारतींचे मालक वारसदार व भोगवटादार यांना इमारतींचे बांधकाम सुस्थितीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र दाखल करणे अनिवार्य करण्यात आले आहे. असे प्रमाणपत्र देण्यासाठी बांधकाम अभियंता यांना पिंपरी चिंचवड मनपाचा परवाना असणे आवश्यक आहे. त्याकरिता खालील प्रमाणे पात्रता असलेल्या बांधकाम अभियंता यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा परवाना प्रप्त करून घेणे आवश्यक आहे. त्याकरिता बांधकाम अभियंता यांनी पिंपरी चिंचवड मनपाकडे आवश्यक ती कागदपत्रे जोडून अर्ज केल्यास संबंधितांना ` १०००/- ना परतावा शुल्क आकारून तीन वर्षासाठी परवाना देता येईल व नुतनीकरणासाठी फी ` २५०/- प्रति वार्षिक भरावी लागेल. याबाबत आवश्यक कागदपत्रांची माहिती पिंपरी चिंचवडमहानगरपालिकेच्या वेबसाईटवर व शहर अभियंता कार्यालयात उपलब्ध आहेत. तसेच सदर सुचनेबाबत ठळक बाबी पुढीलप्रमाणे आहेत .

१) बांधकाम अभियंता यांनी अर्ज केल्यानंतर त्यांच्या पात्रतेसंबंधी तपासणी करताना गुणात्मक विचार करून अर्हतेबद्दल निश्चित निर्णय घेण्याचा अथवा त्यामध्ये बदल करण्याचा अथवा पात्रता ग्रहण असतानाही प्रत्यक्ष चौकशीअंती एखादा अर्ज अपात्र करण्याचा अधिकार महापालिका आयुक्त यांना राहिल.

२) स्ट्रक्चरल ऑडिटसाठी आकारावयाची फी संबंधित व्यक्ती यांनी इमारतीच्या मालकाकडून परस्पर वसूल करावी. या कामासाठीचे फी चे निकष आणि प्रमाणे , तसेच त्यासंबंधीचे निर्माण होणारे कोणतेही वादविवाद यांचा पिंपरी चिंचवड मनपाशी कोणताही संबंध राहणार नाही.

३) उपरोक्त अधिनियमाच्या कलम २६५ (अ) मधील तरतुदींनुसार इमारत बांधकामदृष्टया सुस्थितीत आहे किंवा नाही? याबाबत बांधकाम अभियंत्यांकडून करण्यात येणा-या परिनिरीक्षणात इमारतीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने बांधकाम सुस्थितीची तपासणी करून अविघातक चाचणीबरोबरच इतर चाचण्या व त्यासंबंधीच्या अभिलेखाची तपासणी करण्याचा समावेश आहे.

४) बांधकाम अभियंत्यांच्या नोंदणीसाठी अर्हता आणि पात्रता निकष अधिनियमानुसार कलम २६५ (अ) अन्वये खालीलप्रमाणे असणे आवश्यक आहे. त्यानुसार संबंधितांनी शहर अभियंता कार्यालय येथे आवश्यक कागदपत्रांसह लेखी अर्ज सदरची सुचना प्रसिध्द झाल्यापासून १ महिण्यात सादर करावी.

(क) कोणत्याही मान्यताप्राप्त भारतीय किंवा विदेशी विद्यापीठामधील स्थापत्य अभियांत्रिकीमधील पदवी किंवा सनदी अभियंता किंवा भारतीय अभियांत्रिकी संस्थेच्या समतुल्य विदेशी संस्थेच्या स्थापत्य अभियांत्रिकी विभागातील सहयोगी सदस्य आणि

(ख) संकल्पचित्र काढणाचा व क्षेत्र कामे करण्याचा बांधकाम अभियंता व्यवसायामधील किमान ३ वर्षांचा अनुभव परंतु असे की, पोट कलम (ख) मध्ये करारनिर्दिष्ट केलेल्या ३ वर्षांच्या अनुभवांचा निकषः-

१) बांधकाम अभियंता या शाखेतील कोणत्याही मान्यताप्राप्त भारतीय विद्यापीठाची किंवा विदेशी विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी धारण करणा-या व्यक्तीच्या बाबतीत २ वर्षे आणि

२) बांधकाम अभियंता या विषयातील डॉक्टरेट धारण करणा-या व्यक्तीबाबत एक वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल.

वरील पूर्वपात्रतेप्रमाणे बांधकाम अभियंत्यांची नोंदणी यादी (सूची) तयार करण्यात येईल. कुठलाही अर्ज स्वीकारण्याचा अथवा फेटाळण्याचा हक्क महापालिका आयुक्तांकडे राहील.
सदरची नोटीस मनपाचे www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

जाहिरात क्र.३२
दिनांक – ११.०६.२०१३.

सही/-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८

नमुना " ड "

[ नियम ५ (१) पहा ]

| |
|---|
| पासपोर्ट आकाराचे छायाचित्र |

प्रति,

आयुक्त

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

पिंपरी, पुणे -१ ८

विषय - बांधकाम अभियंता म्हणून नोंदणीसाठी अर्ज

संदर्भ -

माननीय महोदय,

मी, खाली सही करणार, श्री.---------------------------------------- बांधकाम अभियंता, म्हणून, नोंदणीसाठी अर्ज करीत आहे. माझी वैयक्तिक माहिती पुढीलप्रमाणे आहे :-

(१) संपूर्ण नाव :

(२) पत्ता व दूरध्वनी क्रमांक :

(३) शैक्षणिक अर्हता :

(४) अनुभव :

माझी वरीलप्रमाणे नोंदणी करण्यात यावी, अशी मी आपणांस विनंती करीत आहे. मी आपल्या कार्यालयाच्या सर्व आवश्यक बाबींची पूर्तता करीन.

आपला विश्वासू

(-----------------------------)

सहपत्रे : (१) शैक्षणिक अर्हतेच्या सत्य प्रती

(२) अनुभव प्रमाणपत्राच्या सत्य प्रती

(३) प्रकल्प हाताळण्याची सूची.

FORM ‘E’

[ See rule 5 (1) ]

APPLICATION FOR REGISTRATION AS A STRUCTURAL ENGINEER

PASSPORT
SIZE
PHOTOGRAPH

To,

The Commissioner,

Pimpri Chinchwad Municipal Corporation,

Pimpri, Pune – 18

Sub : Application for Registration as a Structural Engineer

Ref :

Respected Sir,

I, the undersigned Shri --------------------------------------, wish to apply for registration as a Structural Engineer.

My Bio-Date is given as below :-

(1) Full Name :

(2) Address and Tel.No. :

(3) Educational Qualification :

(4) Experience :

I request you to kindly grant me above registration. I will comply with all the requirements of your office.

Yours faithfully,

(------------------------)

Encls.- (1) Xerox copies of certificates of educational qualifications.

(2) Xerox copies of Experience Certificates.

(3) List of projects handled.